नवराष्ट्र
www.navarashtra.com

## सचिन शेंडे यांचे प्रतिपादन ; वित्तीय समावेशन शिबिर

# री- केवायसी करा, योजनांचा लाभ घ्या

**अमरावती,** ब्युरो. जिल्हा अग्रणी बँक सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे मंगळवारी (दि. १९) नंदगाव पेठ येथे वित्तीय समावेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात रिजर्व बँक ऑफ इंडिया, नागपूरचे क्षेत्रीय संचालक सचिन शेंडे तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या उपमहाप्रबंधक अंजना श्यामनाथ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

प्रस्ताविक सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रमुख सुनील पांडे यांनी केले. यूनियन बँकचे क्षेत्रीय प्रमुख प्रमोद परहाते यांनी आपल्या विचारांतून वित्तीय साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी रिजर्व बँक ऑफ इंडिया, नागपूरचे क्षेत्रीय संचालक सचिन शेंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, प्रत्येक



बँक खातेदाराने आपली 'री-केवायसी' करून घेणे अत्यावश्यक आहे. तसेच त्यांनी प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना, जीवन ज्योती बीमा योजना आणि अटल पेन्शन योजनेंचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. या शिबिरात सेंट्रल बँक ऑफ इंडियामार्फत काही कर्जदारांना धनादेशाद्वारे कर्जवाटप करण्यात आले. तर यूनियन बँकेतर्फे सुरक्षा बीमा योजनांचे चेक लाभार्थ्यांना देण्यात आले. संचालन एलडीएम नरेश हेडाऊ यांनी केले.

Amravati Plus Edition
Aug 21, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com